# Dr. Babasaheb Ambedkar Jayanti 2025



## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

**विदर्भ मतदार प्रतिनिधी**

**पुसद:** स्थानिक श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे व विद्यार्थिनी मंडळा तर्फे दिनांक १४ एप्रिल २०२५ सोमवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या कार्यकारी प्राचार्य डॉ. रजनी भोयर, प्रा. डॉ. रविप्रकाश चापके, डॉ. स्वप्ना देशमुख, प्रा. सुरेखा भगत, प्रा. डॉ. सरिता चंदनकर (चापके) विचार पिठावर उपस्थित होत्या.

सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला कार्यकारी प्राचार्य डॉ.रजनी भोयर व प्रा. डॉ. वंदना वानखेडे यांनी पुष्पहार अर्पण केला व सर्व उपस्थित प्राध्यापक वृंद व विद्यार्थ्यांनींनी सुद्धा पुष्प अर्पण केलीत. राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे व विद्यार्थिनी मंडळातर्फे संपन्न झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने प्रास्ताविके मध्ये प्रा. डॉ. सरिता चंदनकर यांनी विद्यार्थिनींना व सर्वांना शुभेच्छा प्रदान केल्या व सदर जयंती मोठ्या उत्साहात भारतभर साजरा केली जाते असे विशद केले.

संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन कार्यकारी प्राचार्य डॉ. रजनी भोयर यांच्याद्वारे करण्यात आले व सर्व उपस्थित राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थिनी व प्राध्यापक व अध्यापकेत्तर कर्मचारी यांनी उद्देश पत्रिकेचे त्या मागोमाग उच्चारण केले. प्रा. डॉ. रवी चापके यांनी आपल्या कवितेमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महती वर्तली त्याचबरोबर प्रा. डॉ. रंजना जीवने यांनी हिंदी भाषे मध्ये भीमगीत सदर केले व कार्यक्रमाची शोभा वाढविली.

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे संविधान गौरव महोत्सवा अंतर्गत निबंध स्पर्धेचे व भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यांची बक्षिसे विद्यार्थिनींना अध्यक्षांच्या हस्ते प्रदान करण्यात आलीत. तदनंतर अध्यक्षीय समारोपात कार्यकारी प्राचार्य डॉ. रजनी भोयर यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये केलेल्या कामगिरीचा उल्लेख केला त्यामध्ये व एकूण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र कार्यावर प्रकाश टाकला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सरिता चंदनकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले.

तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. स्वप्ना देशमुख विद्यार्थिनी मंडळ समन्वयक यांनी केले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती दिनानिमित्त पेढे वाटून कार्यक्रमाची सांगता झाली.










